# कोल्हापूर जिल्हा परिषद
## अर्थ समिती सभा क्रमांक - १०/२०१७-१८

वार - बुधवार　　　　　　　　　　　　　　　　　　वेळ - दु. १.०० वा.
दिनांक -०३/०१/२०१८　　　　　　　　　　　　　　स्थळ - समिती सभागृह

**-: कार्यवृत्तांत :-**

अर्थ समिती जिल्हा परिषद कोल्हापूरची मासिक सभा बुधवार दि. ३/१/२०१८ रोजी दु. १.०० वाजता श्री.वसंतराव नाईक सभागृह जि.प.कोल्हापूर येथे आयोजित करणेत आलेली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री.विजय गंगाधर बोरगे | प्र. सभापती |
| २. | मा. श्री.अरुण रामचंद सुतार | सदस्य |
| ३. | मा. श्री.जयश्री संतोष तेली | सदस्या |
| ४. | मा. श्री.दिलिप हरी कांबळे | सदस्य |
| ५. | मा. श्री.पृथ्वीराज भगवानराव सरनोबत | सदस्य |
| ६. | मा. श्री.मल्लाप्पा चन्नाप्पा चौगुले | सदस्य |
| ७. | मा. श्री.पांडुरंग हिंदुराव भांदिगरे | सदस्य |

येणेप्रमाणे मा.सदस्य उपस्थित झालेनंतर मा.सभापती श्री. अंबरिषसिंह घाटगे यांनी रजा दिलेने रजा दिली असलेमुळे सर्व संमतीने श्री.विजय गंगाधर बोरगे यांना प्रभारी सभापती पदी निवड करुन कामकाज सुरु केले. तत्पुर्वी वित्त समितीकडे नवीन सदस्य पदी नियुक्त झालेले मा.श्री.पांडुरंग हिंदुराव भांदिगरे यांचा सभापती मा.श्री.बोरगे यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व सभा कामकाज सुरु करणेबाबत सुचित केले.

<u>श्री. संजय राजमाने, मुख्य लेखा व वित्त अधिकारी -</u>

आजच्या वित्त समितीच्या बैठकीस उपस्थित असेलेले मा.समिती सभापती व सदस्य महोदय तसेच वित्त विभाग व इतर विभागाकडील माझे सहकारी अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरवात करत आहे.

<u>श्री. राहुल के.कदम, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी -</u>

आदरणीय सभापती महोदय यांचे परवानगीने मी विषय पत्रिकेवरील विषयावरील कामकाजास सुरुवात करतो.

<u>विषय क्रमांक - १</u>

**मागील सभा दि.०५/१२/२०१७ चा कार्यवृत्तांत वाचुन कायम करणे.**

<u>ठराव क्रमांक - २३</u>

**मागील सभा दि.०५/१२/२०१७ चा कार्यवृत्तांत वाचुन कायम करणेत यावा.**

सुचक - मा.श्री.दिलिप हरी कांबळे
अनुमोदक-मा.श्री.मल्लाप्पा चन्नाप्पा कांबळे
ठराव सर्वानुमते मंजुर.

<u>विषय क्रमांक -२</u>

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील माहे **नोव्हेंबर २०१७** ची जमा व खर्चाची पत्रके अवलोकन करणे व अंतिम मंजुरीसाठी स्थायी समितीकडे शिफारस करणे.

<u>ठराव क्रमांक - २४</u>

वित्त विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर कडील माहे **नोव्हेंबर २०१७** ची जमा व खर्च पत्रकांना मान्यता देऊन अंतिम मंजुरीसाठी स्थायी समितीकडे शिफारस करणेत यावी.

सुचक - मा.सौ.जयश्री संतोष तेली
अनुमोदक-मा.पृथ्वीराज भ.सरनोबत
ठराव सर्वानुमते मंजुर.

<u>मा.प्र.सभापती -</u> कॅफो साहेब, स्वनिधी बाबत काय स्थिती आहे.

**श्री. राजमाने, मुलेविअ -** आदरणीय सभापती महोदय, ठेवींवरील व्याज व स्थानिक उपकर जमा धरुन एकुण महसुली रक्कम रु. १३ कोटी पर्यंत रक्कम उपलब्ध आहे. व एकुण महसुली खर्च रु. ८ कोटी पर्यंत झाला आहे.

**मा.श्री.भांदिगरे -** सभापती महोदय, अन्य समितींकडे मिळणा-या योजनांचा लाभ अर्थ समितीकडील सर्व सदस्यांनासुध्दा मिळावा. याबाबत प्रयत्न व्हावेत.

**मा. प्र.सभापती -** भांदिगरे साहेब, याबाबत आपण मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करुन पाठपुरावा करु.

**मा.श्री.सरनोबत -** आरोग्य विभागाकडील औषधांचा पुरवठा झाला आहे की नाही.

**सौ.व्हरकट,सलेअ आरोग्य -** होय, खरेदी झालेप्रमाणे पुरवठा करणेत आलेला आहे.

**मा.श्री.भांदिगरे -** कॅफो साहेब, समाजकल्याण व मबाक च्या मागील वर्षीचा अनुशेष यावर्षी खर्च होणार काय?

**श्री. राजमाने, मुलेविअ -** समाजकल्याण,अपंगकल्याण व महिला बालकल्याण विभागांकडील तरतुद अखर्चित राहिल्यास पुढच्या वर्षात खर्च करणेस परवानगी आहे.

**मा.सौ.तेली -** समाजकल्याण विभागाकडुन यावर्षी शैक्षणीक साहित्य पुरवठा याची योजना आहे काय?

**श्री. बागडीकर, कक्ष अधिकारी स. क.-** नाही, यावर्षी सदरची योजना नाही.

**मा.श्री.सरनोबत -** जिल्हा परिषदेकडील विविध समिती यांना पारंपारीक योजना बंद करुन (उदा.ताडपत्री,शिलाई मशीन्स, झेरॉक्स मशीन इ.) नाविन्यपुर्ण योजना राबविणेबाबत प्रयत्न व्हावेत.

**श्री. राजमाने, मुलेविअ -** यासाठी खरेदी साहित्य यादीमधुन योजना स्विकारावी लागते अथवा वेगळी योजना राबविणेसाठी विभागाने प्रस्ताव पाठवुन शासनाकडुन मान्यता घ्यावी लागते.

**मा.श्री.सरनोबत -** कॅफो साहेब, पन्हाळा पंचायत समितीच्या मालकीची जागा केडीसीसी बँकेसाठी भाडयाने देणेबाबतचा प्रस्ताव दिला आहे. यासाठी मान्यता मिळावी.

**श्री. राजमाने, मुलेविअ -** जिल्हा परिषदेने यासाठी बांधकाम विभागाकडे श्री.शिंदे, इस्टेट डेव्हलपमेंट ऑफिसर यांची नेमणुक केली असुन. त्यांचेमार्फत या सर्व प्रस्तावांवर कार्यवाही केली जाते.

अन्य विषय व चर्चा नसलेने मा.सभापती यांनी पुढीलप्रमाणे आभार मानले.

**मा.सभापती -** आजच्या वित्त समितीला उपस्थित असणारे सन्माननीय सर्व सदस्य / सदस्या त्याचप्रमाणे सचिव श्री.राजमाने साहेब व त्यांचा सहकारी अधिकारी व कर्मचारी वर्ग त्याचप्रमाणे उपस्थित इतर खात्याकडील अधिकारी व कर्मचारी यांनी आजच्या वित्त समितीचे सभा कामकाज चालविणेसाठी दिलेल्या सहकार्याबददल अर्थ समितीच्या वतीने मी सर्वांचे मन:पुर्वक आभार मानतो. तसेच, उपस्थित सर्व सन्माननीय सदस्य व सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी नवीन वर्षाच्या शुभेच्छा देतो व पुढील सभेस सर्व खात्याकडील खर्चाची माहिती घेणेकामी सर्व सबंधीत अधिकारी वर्गास उपस्थित राहणेची सुचना करुन आजची सभा संपल्याचे जाहिर करतो.

दि. ०३/०१/२०१८.

**(संजय ध.राजमाने)**
**सचिव**
**अर्थ समिती,**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**

**(श्री.विजय गंगाधर बोरगे)**
**प्र. सभापती**
**अर्थ समिती,**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**